संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# शरीर, मन हेच धन सांगणारी त्रयोदशी

अनंत आकाशातले तारे, नक्षत्र, जेव्हा आकाशदिव्यांच्या रुपात भूतलावर अवतरतात. तेव्हा त्याला दीपोत्सव म्हणतात. आजपासून भारतीय संस्कृतीतल्या सर्वात मोठ्या प्रकाशपर्वाला सुरुवात होत आहे. धनत्रयोदशीपासून सुरू होणारा हा दीपोत्सव भाऊबीजेपर्यंत अत्यंत उत्साहाने आनंदाने साजरा होतो. आबालवृध्दांपासून ते गरीब श्रीमंतांपर्यंत सर्वानाच आनंदाचे क्षण वेचण्याचे भाग्य या दीपोत्सवातून लाभते. आजची धनत्रयोदशी सणाची पूजा सांगणारी, धनातून म नाच्या समाधानाचे वरदान देणारी असते. वैशिष्ट्य असे आहे की, या धनत्रयोदशीचा अर्थ जर नीट समजून घेतला तर कशाला धन म्हणायचे, कशाला संपत्ती म्हणायचे, कशाला पैसा म्हणायचे किंवा यातला फरक सांगण्याचे काम धनत्रयोदशी करत असते. भारत हा कृषीप्रधान देश आहे. प्राचीन काळापासून दीपोत्सव साजरा होतो. धनत्रयोदशीला थेट यमाची पूजा करण्याची परंपरा सांगितली जाते. याशिवाय आरोग्याची किंवा आयुर्वेदाची अधिष्ठात्री देवता म्हणून धन्वंतरीची पूजा देखील याच दिवशी सांगितली गेली. केवळ सोने-नाणे, चांदी, रुपया म्हणजे धन नाही. ते धनाचे समाधान मिळवून देणारी जी कोणती गोष्ट असेल ते खरे धन. अशा प्रकारचा संदेश या धनत्रयोदशीने दिला आहे. मनाचे आरोग्य चांगले असेल, प्रफुल्लीत असलेले मन हे सर्व प्रकारच्या समस्यांशी सामना करू शकते. संकटे परतवून लावू शकते. नव्या योजना नवे संकल्प पूर्णत्वाला नेण्याकरता मनाचा आनंद हा अधिक महत्त्वपूर्ण ठरतो. मन प्रफुल्लीत ठेवायचे असेल तर त्याला शरीराची सुदृढता आवश्यक असते आणि या शरीराचा आणि मनाचा समन्वय साधून आरोग्यरुपी धनाचे महत्त्व धनत्रयोदशीला सांगण्याचा प्रयत्न आपल्या ऋषीमुनींनी केलेला दिसतो. म्हणजेच दीपावली पर्वामधल्या आनंदाचा अनुभव घ्यायचा असेल तर शरीर आणि मनदेखील तितकेच प्रफुल्लीत राहायला हवे. दीपोत्सवाच्या सुरुवातीला धनत्रयोदशीची योजना करून विचारपूर्वक त्या सणाचे महत्त्व सांगितले गेले.

### मनाच्या समाधानासाठी

जगामध्ये अनेक संस्कृती आणि धर्म आहेत. परंतु खऱ्या अर्थाने मानवी मनाचा विचार करून विश्वशांतीचा संदेश सांगणारा हा दीपोत्सव फक्त भारतीय संस्कृतीतच पहायला मिळतो. हजारो वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा आज अखंडपणे सुरू आहे. त्यातला हेतू नीट समजून घेतला पाहिजे. समाजमनाचा आरसा म्हणून या उत्सवांकडे पाहिले गेले पाहिजे. भारत हा शेतीवर आधारित अर्थव्यवस्था असलेला देश मानला जातो. प्राचीन काळी आतासारखी चलनव्यवस्था नव्हती. वस्तूंच्या स्वरुपात आदान-प्रदान करून समाजाची गरज भागवली जात होती. आणि म्हणून प्राचीन काळी शेतीतून मिळणारे उत्पन्न हेच एक धन मानले जायचे. धनत्रयोदशीला शेतात नव्याने आलेली कणसं, कापूस, घरी आणली जात आणि त्याची धनत्रयोदशीला पूजा केली जाई. समाजाच्या अन्नधान्याची पूर्तता करणाऱ्या शेतीतल्या उत्पन्नाकडे धन म्हणूनच पाहिले जात होते. आज काळ बदलला आहे. तरीसुध्दा पूजा करताना अजूनही ग्रामीण भागाम ध्ये शेतीतले नव्याने आलेले पीक घरी आणून त्याची पूजा केली जाते. शिवाय सोने-चांदीचीही पूजा करून तीच आपली संपत्ती आहे असे मानले जाते. त्यातला आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे, या धनाची पूजा करताना प्रसाद म्हणून धणे आणि गुळ यांचा उपयोग केला जातो. आरोग्यासाठी प्रकृतीसाठी उपकारक असलेल्या या गोष्टींचे सेवन यानिमित्ताने झाले पाहिजे, असाही प्रयत्न केला जातो. धनाचा संबंध थेट मनाच्या समाधानासाठी आहे आणि म्हणून केवळ पैसा पैसा असा हव्यास न धरता आपल्याकडे असलेल्या संपत्तीची पूजा करायची आणि मनाचा आनंद द्विगुणित करायचा. आजच्या सगळ्या या व्यापारी युगामध्ये पैसा म्हणजे एकमेव धन अशा प्रकारची ठाम समजूत निर्माण झाली आहे. पण सकाळपासून संध्याकाळपर्यंत धावाधाव करणाऱ्या माणसाला तितकेसे समाधान प्राप्त होत नाही आणि पैशाचा हव्यास सुटत नाही म्हणून पैसाही पुरत नाही. कुठेतरी मनुष्याने आपल्या मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. सगळ्या जीवनामध्ये केवळ पैसा हे सर्वस्व नसून मन शरीर आणि त्यातून मिळणारे समाधान हेच मोठे धन आहे असा संस्कार यानिमित्ताने रुजवला गेला. प्रश्न फक्त एवढाच आहे की, सणातून दिला गेलेला हा बारीकसा संदेश आपण किती समजून घेतो किंवा समाज त्याप्रमाणे किती वागतो. दुर्दैव असे आहे की, सण तर साजरे होतात. एकमेकानां शुभेच्छा दिल्या जातात. पण, समाधानातून ज्या मन:शांतिचा अनुभव यायला पाहिजे, तो मात्र मिळत नाही.

### सण समजून घेतला पाहिजे

धनत्रयोदशीचा अर्थ हा समाजाला खऱ्या धनाची ओळख करून देणारा आहे. सतत पैशामागे न धावता काही काळ मनासारख्या धनाचीदेखील पूजा केली पाहिजे. ज्याला 'आरोग्यम् धनसंपदा' म्हटलेले आहे त्या शरीराचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. या दोन गोष्टी समजून घेतल्या तर मनुष्य आपल्याला पाहिजे तसा आणि पाहिजे तितका पैसा मिळवू शकतो. त्यातला योगायोगाचा भाग असा की, याच धनत्रयोदशीला यमाची पूजा सांगितली जावी. याचाच अर्थ मन, शरीर यांच्या सुदृढतेवर दीर्घायुष्य अवलंबून असते. ते प्राप्त करायचे असेल तर आचार-विचार आणि व्यवहार या गोष्टींचेही संतुलन साधता आले पाहिजे. आयुर्वेदाची देवता असलेल्या धन्वंतरीने आरोग्याचे महत्त्व पटवून दिले आहे. म्हणूनच मन, शरीर आणि इतर संपत्ती या तीनही गोष्टींना धनाची उपमा देऊन समाधानाचे वरदान या दिवसाच्या निमित्ताने मिळवता येते. म्हणूनच दीपोत्सवात येणारा प्रत्येक सण साजरा करताना तितक्याच गंभीरतेने तो समजून घेतला पाहिजे.